# प्रतिज्ञापत्र

सेतुमाधवराव पगडी यांचे ऐतिहासिक लेखन हा लघुशोध प्रबंध मी लिहिलेला आहे आणि इतिहास विषयातील एम्.फिल.पदवीसाठी शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला आहे. या लघुशोध प्रबंधासाठी वापरलेल्या संदर्भ साधनांचा योग्य निर्देश केलेला आहे.

कोल्हापूर

दिनांक:३०डिसेंबर,२०००

S.V.Patil

कु.संगिता विठ्ठल पाटील

# इतिहास विभाग

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या सामाजिकशास्त्र शाखेतील इतिहास विषयातील एम्.फिल.पदवीसाठी कु.संगिता विठ्ठल पाटील हिने सादर केलेल्या सेतुमाधवराव पगडी यांचे ऐतिहासिक लेखन या लघुशोध प्रबंधातील कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली करण्यात आलेले आहे.

तिचे कार्य अस्सल आहे आणि या लघुशोध प्रबंधासाठी उपयोगात आणलेल्या संदर्भ साधनांचा योग्य निर्देश करण्यात आलेला आहे. हा लघुशोध प्रबंध परीक्षणासाठी तयार असून तो परीक्षणासाठी विद्यापीठाकडे पाठविण्याची मी शिफारस करीत आहे.

कोल्हापूर
दिनांक: ३० डिसेंबर, २०००

डॉ.अरुण भोसले,
इतिहास विभाग प्रमुख,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# प्रास्ताविक

सेतुमाधवराव पगडी हे महाराष्ट्रातील एक प्रसिध्द इतिहास-संशोधक म्हणून ओळखले जातात. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. महाराष्ट्रात वि.का.राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे, द.ब.पारसनीस, गो.स.सरदेसाई, ग.ह.खरे, त्र्यं.शं.शेजवलकर, द.वा.पोतदार वगैरे नामवंत व निष्ठावंत इतिहास संशोधकांनी मराठा इतिहास लेखनाची व ऐतिहासिक साधने संकलित करण्याची जी थोर आणि उज्ज्वल परंपरा निर्माण केली त्या परंपरेतील सेतुमाधवराव पगडी हे एक महत्वाचे संशोधक व लेखक होते.

सेतुमाधवराव पगडी हे अनेक भाषांचे पंडित होते. त्यांना मराठी, कन्नड, तेलगू, हिंदी, उर्दू, फारसी, बंगाली, इंग्रजी, गोंडी, कोलामी इत्यादी भाषा अवगत होत्या. प्रचलित इतिहास संशोधन पध्दतीतील उणीवा व दोष त्यांनी आपल्या लिखाणातून दाखवून दिले. त्यांचे लिखाण विविधांगी होते. त्यांनी अनेक लेख, पुस्तके लिहिली व ते खऱ्या अर्थाने संशोधकांचे मित्र ठरले. त्यांनी भारतीय इतिहासाच्या मध्ययुगीन, मराठाकाल व आधुनिक कालखंडासंबंधी लेखन केले.

महाराष्ट्रातील काही व्यासंगी संशोधकांनी सेतुमाधवराव पगडींच्या इतिहासविषयक विपुल लेखनाचा आणि संशोधनाचा आढावा घेण्याचा उल्लेखनीय प्रयत्न केलेला आढळतो. वाईच्या मराठी विश्वकोश कार्यालयात दीर्घकाळ काम केलेले श्री. सुरेश रघुनाथ देशपांडे यांनी "मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार" या आपल्या ग्रंथात पगडींच्या मराठ्यांच्या इतिहासाविषयीच्या लेखन-संशोधनाचा साक्षेपी आढावा घेतला आहे. अलीकडे औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील दोन संशोधकांनी पीएच्.डी.पदवीसाठी विद्यापीठाला सादर केलेल्या आपल्या संशोधन प्रबंधात सेतुमाधवराव पगडींच्या ऐतिहासिक संशोधनपर लेखनाची चिकित्सा केली आहे. श्री.एस्.जी.पाटील, पैठण, यांनी " सेतुमाधवराव पगडी यांच्या विशेष संदर्भातून मराठ्यांच्या इतिहासाचे लिखाण - एक अभ्यास" या शीर्षकाचा प्रबंध लिहिला आहे. त्याचप्रमाणे श्री.डी.यु.खडसे,

चिपळूण, यांनी "महाराष्ट्रातील प्रमुख इतिहासकार व त्यांचा दृष्टीकोण एक टीकात्मक अभ्यास"या आपल्या प्रबंधात सेतुमाधवराव पगडींच्या इतिहासविषयक लेखनाचा आढावा घेतला असून त्यांच्या विशिष्ट दृष्टीकोणाची परखड चिकित्सा केली आहे. तथापि सेतुमाधवराव पगडींच्या संशोधन कार्याची व इतिहासविषयक त्यांच्या समग्र लेखनाची वस्तुनिष्ठ मीमांसा झाल्याचे आढळत नाही. शिवाय त्यासंबंधी तौलनिक्‍ अभ्यास होणेही अगत्याचे वाटते.

सेतुमाधवराव पगडींच्या संशोधन कार्याची व त्यांच्या इतिहासविषयक समग्र लेखनाची वस्तुनिष्ठ चिकित्सा करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत प्रबंध लिहिलेला आहे. त्यासाठी सेतुमाधवराव पगडींच्या बहुतेक सर्व प्रकारच्या लेखनाचा परामर्ष घेतला आहे. त्यांच्या समकालीनांचे लेखन व त्यांचे अभ्यासविषयक विविध दृष्टीकोण यांचा अभ्यास करून काही तौलनिक निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे. एकूणच भारतीय इतिहासाच्या संशोधन व लेखनात सेतुमाधवराव पगडी यांनी दिलेल्या योगदानाचा विस्तृत आढावा प्रस्तुत प्रबंधात घेतला आहे.

या प्रबंधाची विभागणी एकूण पाच प्रकरणांत केली आहे. पहिल्या प्रकरणात सेतुमाधवराव पगडींचा समग्र जीवनपट सादर केला आहे. मध्ययगीन इतिहासाबाबतच्या विशेषत: शिवपूर्वकालातील मध्ययुगीन द:खनच्या इतिहासासंबंधी पगडींनी केलेल्या लेखनाचा आढावा प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणांत घेतला आहे. तिसऱ्या प्रकरणात मराठ्यांच्या इतिहासाचे अध्ययन, संशोधन व त्याचे राष्ट्रीय दृष्टीकोणातून महत्व विशद करणे इत्यादीबाबत सेतुमाधवरावांनी बजावलेल्या मौलिक कामगिरीची सांगोपांग चर्चा केली आहे. चौथ्या प्रकरणात भारतीय स्वातंत्र्ययुध्दांतील काही महत्वाच्या घटनांचे हैदराबाद राज्यांत उमटलेले पडसाद व तेथे आढळणारे त्यांचे धागेदोरे यांची चर्चा केली आहे. समारोपाच्या पाचव्या प्रकरणांत संशोधनाचे महत्वाचे निष्कर्ष साररूपाने मांडले आहेत. प्रबंधाच्या अखेरीस संदर्भसाधनांची सूची दिली आहे. सेतुमाधवराव पगडींचे अन्य विषयांवरील

लेखन (ललित साहित्य ) व त्यांना आयुष्यात लाभलेले विविध मानसन्मान यांची माहिती दोन वेगवेगळ्या परिशिष्टात दिली आहे.

या निमित्ताने सेतुमाधवराव पगडी यांचे ऐतिहासिक लेखन अभ्यासण्याची सुवर्णसंधी मला लाभली. ही अमोल संधी उपलब्ध करून देण्यात मला अनेकांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य लाभले. त्या सर्वांनी मला उत्तेजन दिले त्याबद्दल या सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

माझे मार्गदर्शक व शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख डॉ.अरूण भोसले यांनी मला या कामी अतिशय आस्थेने व सातत्याने मार्गदर्शन केले. त्यांनी माझ्यासाठी घेतलेले परिश्रम, दिलेले प्रोत्साहन यामुळेच हे कार्य मी पुरे करू शकले. त्यांनी माझ्याबाबतीत दाखविलेली आपुलकी, जिव्हाळा आणि सहकार्य या सर्व गोष्टीमुळेच मला हे काम करणे शक्य झाले. माझ्या या गुरूवर्यांची मी मन:पूर्वक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागातील डॉ.भा.दे.खणे, डॉ.म.आ.लोहार, डॉ.मा.प्र.पाटील, डॉ.सौ.पद्मजा पाटील, डॉ.सौ.नंदा पारेकर यांचेही मला प्रोत्साहन मिळाले. त्याबद्दल मी या सर्व गुरूजनांची आभारी आहे.

वारणानगर जि.कोल्हापूर येथील यशवंतराव चव्हाण, वारणा महाविद्यालय, वारणानगर येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ.सुभाष पाटील यांनीही मला वेळोवेळी सहकार्य व प्रोत्साहन दिले आहे. या गुरूवर्यांची मी आभारी आहे.

माझे सासरे श्री.एस्.के.पाटील (काका), अध्यक्ष, पलूस शिक्षण प्रसारक मंडळ, पलूस व पलूस येथील आमच्या कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.बी.एन्.पवार यांचे मला बहुमोल सहकार्य व प्रोत्साहन लाभले आहे. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी, ग्रंथपाल व सर्व कर्मचारी वर्ग यांचे मला सहकार्य लाभले. त्या सर्वांची मी आभारी आहे.

माझे चुलते श्री.रघुनाथ पिराजी पाटील, चुलती सौ.ताराबाई,

माझे सासरे डी.के.पाटील, सासूबाई सौ.सावित्री पाटील, आई श्रीमती इंद्रायणी पाटील यांचा आशीर्वाद मला नेहमीच लाभला आहे. माझे भाऊ डॉ.अभय, संपत, सयाजी व वहिनी डॉ.ऋता, मीना, सुचेता, माझा भाचा माधव व भाची कु.माधवी यांची या कामी खूपच मदत झाली आहे. चि.संकेत या चिमुकल्याने वेळ दिल्यामुळे त्याचीही मला मदत झाली. माझे पती श्री.संपत पाटील यांचे या संशोधनकार्यात खूपच सहकार्य व प्रोत्साहन लाभले. या सर्वांची मी ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठ, इतिहास विभागातील लेखनिक श्री.सुतार, शिवाजी विद्यापीठाच्या बॅ.बाळासाहेब खर्डेकर, ग्रंथालयातील कर्मचारी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे व पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालयातील कर्मचारी या सर्वांनी मला मोलाची मदत केली आहे. त्या सर्वांचे मी आभार मानते.

सुमती कॉम्प्यूटर्स, श्रुतिचंद्र, पलूस यांनी डी.टी.पी.चे काम वेळेत पूर्ण करून दिले. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

शेवटी या संशोधन कार्यासाठी ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले, प्रोत्साहन दिले आणि माझ्यासाठी सुयश चिंतिले, त्या सर्व ज्ञात-अज्ञातांचे मी मन:पूर्वक ऋण व्यक्त करते.

कोल्हापूर

दिनांक: ३० डिसेंबर,२०००

कु.संगिता विठ्ठल पाटील

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | |
| १) | सेतुमाधवराव पगडी जीवनपट | १ - २६ |
| २) | मध्ययुगीन इतिहास (शिवपूर्वकाल) | २७ - ७० |
| ३) | मराठ्यांचा इतिहास | ७१ - १२९ |
| ४) | आधुनिक कालखंड | १३० - १५६ |
| ५) | समारोप | १५७ - १६८ |
| | संदर्भ साधने | १६९ - १८८ |
| | परिशिष्ट क्रमांक १ | १८९ - १९० |
| | परिशिष्ट क्रमांक २ | १९१ - १९२ |